महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ४२

# महाराजा सयाजीराव आणि बालगंधर्व

## धारा भांड मालुंजकर



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ४२

# महाराजा सयाजीराव आणि बालगंधर्व

धारा भांड मालुंजकर

महाराजा सयाजीराव
आणि बालगंधर्व
इतिहास
धारा भांड मालुंजकर

●

प्रकाशन क्रमांक - ६२
पहिली आवृती - २०२१

●

प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील

●

लेखक : धारा भांड मालुंजकर
१, निवास ब्लॉसम, शरणपूर त्र्यंबक,
लिंक रोड, कॅनडा कॉर्नर,
नाशिक -४२२ ००५
मो. ९८८१७४५६०८

●

मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद

●

मुखपृष्ठ : महेश मोधे

●

वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद

●

किंमत : २७ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# बालगंधर्व

सुभाषितकारांनी मनुष्याच्या संस्कृतीचे चिन्ह म्हणून साहित्य, संगीत आणि कला यांचे अस्तित्व त्याच्या ठिकाणी वर्णिले आहे. ही संस्कृती महाराजांनी आपल्या आयुष्यक्रमात वर्तनाने सार्थ करून दाखविली आहे. बडोदे राज्यात अभिवृध्दीला उत्तेजन देण्याचे कार्य काही अपरिचित नव्हते. सयाजीराव महाराजांच्या पूर्वी होनाजी बाळा, सगनभाऊ या प्रसिध्द शाहिरांना बडोद्याच्या तत्कालीन अधिपतींची पुष्कळ मदत होती. प्रसिध्द कवी, शाहीर अनंत फंदी हे बडोद्याचे वतनदार होते. त्यांचे नातू स्वत: आख्याने रचून बडोद्यास कीर्तने करीत असत. त्यांचे दहा-बारा वर्षांचे दोघे नातू नवीन पोवाडे लिहू लागले. लिहिलेले पोवाडे महाराजांसमोर गाऊ लागले होते. खंडेराव महाराज हेही अशा गुणी कलाकारांना चांगला आश्रय देत असत. त्यांच्यानंतर मातु:श्री जमनाबाईसाहेबांनी ही परंपरा चालू ठेवली.




बडोदा राज्यात इ.स. १८७४ अखेरपर्यंत कलावंत खाते अस्तित्वात असल्याची कुठे नोंद सापडत नाही. इ.स. १८७५ साली सयाजीराव महाराज गादीवर आल्यावर प्रथम आठ गवयांची नेमणूक होऊन कलावंत खात्याची सुरुवात झाली. त्यामुळे कलावंत खात्यास स्वतंत्र विभाग असे स्वरूप येण्यास सयाजीराव गायकवाड यांच्या कारकीर्दीत सुरुवात झाली असे म्हणता येईल.

इ.स. १८९७-९८ मध्ये प्रसिद्ध गवई मौलाबक्ष यांचे चिरंजीव डॉक्टर अल्लाउद्दीन यांना पाश्चिमात्य संगीतशास्त्राची माहिती करून घेण्यासाठी महाराजा सयाजीरावांनी विलायतेस पाठविले. ते तेथून सदर शास्त्राचा अभ्यास करून आल्यावर त्यांची कलावंत खात्यावरील मुख्याधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती. कलावंत खात्यास स्वतंत्र विभाग असे पूर्ण स्वरूप इ.स. १९०० मध्ये प्राप्त झाले. हा स्वतंत्र विभाग १९१२-१३ पर्यंत चालू होता. इ.स. १९१८-१९ मध्ये डायरेक्टर ऑफ म्युझिक आणि त्याच वर्षाअखेर भारतीय संगीत शाळेचे प्रिन्सिपॉल यांच्या ताब्यात दिला गेला. या विभागाची सगळी कागदपत्रे स्वतंत्र रीतीने हुजूर हुकुमाप्रमाणे ठेवण्यात आली होती.


ज्ञानासारखे पवित्र आणि शक्तिमान दुसरे काही नाही. राजाचा मोक्ष जनकल्याणात असतो; तसेच धर्माने गरिबांचा कैवारी बनावे. परिवर्तनशील जगात धर्मांचे स्थान आहे. हे मानणाऱ्या महाराजा सयाजीरावांना माणसांची आणि उत्तम गुणांची पारख होती. त्यामुळे देशभरातील उत्तम प्रशासक, शिक्षणतज्ज्ञ, कलावंत, साहित्यिक, चित्रकार, शिल्पकार, नाटककार, छायाचित्रकार, चित्रपट निर्माते, भाषातज्ज्ञ, क्रांतिकारक, विचारवंत बडोद्यात जमा झाले होते. त्यातून जगप्रसिध्द नाटककार बालगंधर्व, महान चित्रकार राजा रवी वर्मा, संगीतकार अब्दुल करीम खॉं, अब्दुल हक़, चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके, इटालियन मूर्तिकार फेलिसी, फॅटमन, महान

शिल्पकार कोल्हटकर, त्रिभुवनदास गज्जर, उस्ताद मौलाबक्ष खॉं अशा अनेक जगप्रसिध्द महान कलावंत मंडळींच्या प्रगतीचा पाया बडोद्यात रोवला गेला. हे महाराजा कलासक्त असल्याचे मोठे उदाहरण होय. त्यामुळे बडोदा हे संस्थान कला आणि कलाकारांना राजाश्रय देण्यासाठी प्रसिध्द होते.

## बालगंधर्व

बालगंधर्व म्हणजे नारायण श्रीपाद राजहंस ( देशपांडे ) यांच्या गाणाऱ्या गळ्यानं कित्येक पिढ्यांना रिझवलं, खुलवलं आणि फुलवलं आहे. संगीत नाटकात आज त्यांचे नाव अजरामर झाले आहे. संगीत नाटक हे त्यांच्या जीवनाचे ध्यासपर्व होते. त्यांना रसिकांचे प्रेम भरभरून मिळाले. नारायण राजहंसचे स्वर लोकमान्य टिळकांनी ऐकले आणि त्यांनी “बालगंधर्व” ही उपाधी त्यांना बहाल केली. आजतागायत ते सर्वांच्या मनात प्रसिध्द संगीतकार बालगंधर्व म्हणूनच स्थिरावलेले आहेत. बालगंधर्वांचा जन्म पुण्यात २६ जून १८८८ रोजी झाला. १९११ पर्यंत गंधर्वांची कीर्ती सर्वत्र पसरली होती आणि १९१३ साली त्यांनी ‘गंधर्व नाटक मंडळी’ ची स्थापना केली. गंधर्व नाटक मंडळीची नाटकं जसजशी होत राहिली तशी बालगंधर्वांची लोकप्रियता कायमच वाढत गेली.

गंधर्व मंडळीच्या धंद्याच्या सर्व गोष्टी सुरळीत चालू झाल्या होत्या. महाराज सयाजीराव गायकवाडांमुळे बडोदा संस्थान कलावंतांच्या राजाश्रयासाठी प्रसिध्दी पावू लागले होते. याच



Bal Gandharva as Rukmini in the play *Swayamwar* written by K.P. Khadilkar

सुमारास बडोद्याचे रावसाहेब शिरगावकर मुंबईस आले. त्यावेळेस त्यांना भेटून बडोद्याच्या राजाश्रयाचे प्रयत्न सर्वांनी सुरू केले होते. हे काम प्रसिध्द हार्मोनियम वादक गोविंदराव टेंभे यांनी सुरू केले होते. त्यांनी कंपनीतील घटकांची, कंपनीच्या उत्पादनाची व एका महिन्यात मिळालेल्या लोकप्रियतेची शिरगावकरांना माहिती दिली. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे खाडीलकर, देवल, साठे इत्यादी बड्या प्रस्थांचा पाठिंबा व बोर्डातील मंडळींची नावे इ. गोष्टींमुळे ही गंधर्व कंपनी जरी नवी असली तरी राजाश्रयाला सर्वस्वी योग्य आहे; अशी त्यांची खात्री पटवली.

## बडोद्याच्या राजाश्रयासाठी प्रयत्न

रावसाहेब शिरगावकरांनी श्री. सयाजी महाराजांजवळ गंधर्व कंपनीची शिफारस केली आणि महाराजांनी संमती दिली; पण त्यापूर्वी त्रिवर्ग भागीदारांना भेटीस बोलावले. महाराज काही कामानिमित्त मुंबईस आले होते व नेपिअन सी वरील ‘जयमहाल’ पॅलेसमध्ये त्यांनी बालगंधर्व व सर्व भागीदारांची भेट घेतली. सर्वजण महाराजांच्या भेटीला उंची वस्त्र, फेटे घालून गेले होते. दरबार हॉलमध्ये ठरल्याप्रमाणे सर्वजण हजर झाले.


महाराज दरबार हॉलमध्ये आले. ते खूप घाईत होते त्यामुळे घाईघाईतच बोलले. महाराज म्हणाले, “ शिरगावकरांनी मला तुमच्याविषयीची सर्व माहिती दिली, ठीक आहे; पण, एक गोष्ट आपणही लक्षात ठेवा की राजेलोकांप्रमाणे नाटकांचा आम्हाला नाद लागला आहे आणि म्हणून मी तुम्हाला आश्रय देत आहे;

अशी कल्पना करू नका. त्यात नादिष्टपणा नाही; केवळ इतर कलेप्रममाणे नाट्यकलेला राजाश्रय देणे फार जरूर आहे व कर्तव्य आहे असे माझे मत आहे. आश्रयाच्या हुकुमांतील अटी मात्र कसोशीने पाळल्या पाहिजेत आणि त्या पलीकडे कसलीही अपेक्षा ठेवू नका." इतका स्पष्ट मथितार्थ सांगणारे महाराजांचे बोलणे होते. हे ऐकून सर्वजण थोडावेळ स्तब्ध झाले होते. "Do you understand?" या प्रश्नावर गोविंदराव टेंभे म्हणाले, " Yes, Your Highness we shall try our utmost to deserve your gracious patronage." त्यावर " That's right " मी जातो. हे तुमचे शिरगावकर साहेब पुढची तजवीज करतील. एवढे बोलून महाराज निघून गेले.

## बडोद्याचा राजाश्रय

थोड्याच दिवसात राजाश्रयाचा खलिता आला. महाराजांची आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्षातून एक महिना बडोद्यास जायचे; सरकार दरबारी तीन किंवा पाच खेळ करायचे आणि पाच हजार रुपये मिळायचे. पुढेमागे कंपनीतील योग्य इसमाला युरोपास तेथील नाट्यकलेची माहिती घेण्यास पाठविण्याचा महाराजांचा मानस होता. या शेवटच्या कलमामुळे गोविंदराव टेंभेंना विलायतेला जाण्याची अंधुक आशा निर्माण झाली होती. केवळ रावसाहेब शिरगावकरांच्या प्रयत्नांमुळे गंधर्व कंपनीला राजाश्रय

मिळाला होता. “श्री. म. सयाजीराव गायकवाड राज्य बडोदे यांच्या खास आश्रयाखालील” अशी अक्षरे गंधर्व कंपनीच्या जाहिरातीवर आणि कागद-लिफाफ्यावर झळकू लागली होती.



मुंबईहून कंपनी बडोद्यास गेली. सरकार दरबारी खेळ झाले. प्रत्येक सरकारी खेळाला खासे स्वाऱ्यांकरिता कोच, खुर्च्या वगैरे सर्व व्यवस्था व बंदोबस्त सरकारी असे. वन्समोर करता श्री. महाराजांपुढे एक आणि महाराणींपुढे एक अशा बटणाच्या घंटा असत. विलायतेतील पध्दतीप्रमाणे अंकावर पडदा पडला म्हणजे औपचारिक टाळी द्यायची. वनस्मोअरला घंटा व्हायची. घंटेचा हा प्रकार विलायती नसून राजवाडी रसिकतेचा होता ! महाराज संगीत ऐकण्यास बसत; परंतु श्री. राणीसाहेबांना मात्र संगीताचा खरा शौक होता. त्या स्वत: सतार वाद्य वाजवित असत. राणीसाहेब जितक्या रसज्ञ व मार्मिक तितक्याच त्या तेजस्वी व पाहणाऱ्यांच्या मनात त्यांच्याविषयी दरारा व आदरभाव निर्माण होत असे.

## महाराजांकडून गंधर्व कंपनीला रु. ५००० वर्षासन

बालगंधर्वांच्या लोकप्रियतेमुळे त्यांची नाटक बडोदा दरबारीही रंगू लागली आणि त्यांना बडोदा संस्थानाचा राजाश्रय मिळाला. महाराजांकडून गंधर्व कंपनीला रु. ५००० वर्षासन मिळू लागले होते.

बालगंधर्व बडोद्यात जात तेव्हा त्यांचा पहिला नाट्यप्रयोग राजवाड्यात खाजगीत होत असे. तेव्हा त्यांना एक हजार रुपये देऊन महाराज त्यांचा सन्मान करीत असत. त्यांच्या सर्व सहकलाकारांनाही तेवढाच मान दिला जाई. त्यांच्या सन्मानार्थ महाराज चार हजार रुपये देत असत. महाराजांच्या कुटुंबातल्या स्त्रियांकडून बालगंधर्वांना किमती शालू भेटीदाखल मिळत



असत. तेव्हा सयाजीराव कौतुकानं म्हणत, " माझ्या नारायणाला असा सुंदर शालू नेसून पाहिलं की किती आनंद वाटतो !"

याखेरीज दरवर्षी महाराज गंधर्व नाटक मंडळीवर दहा ते पंधरा हजार रुपये खर्च करीत असत.

त्यांच्याविषयी बालगंधर्व आत्मचरित्राच्या टिपणात म्हणतात-

"अशी विशुध्द, निरपेक्ष रसिकता आणि औदार्य आता दुर्लभच !"

गंधर्व नाटक मंडळी विसर्जित झाली तेव्हा सयाजीरावांना काय वाटलं त्याची नोंद कुठे आढळत नाही. १९३९ साली महाराज दिवंगत झाले तेव्हा बालगंधर्वांचा मोठा आधारस्तंभ गेला.


( तावटे अरविंद, २००३, बालगंधर्व, पान नं ५८-५९ )

महाराजांचा असा एक नियम होता की, नाटकाचे खेळ भल्या पहाटेपर्यंत चालू नयेत. नाटक कटाक्षाने रात्री आठ वाजता सुरू होऊन मध्यरात्रीपूर्वी संपावे. पण हे सगळे कडक बंधनं तेव्हाच पाळली जात असत, जेव्हा महाराज जातीने कार्यक्रमाला हजर असत. अन्यथा कलावंताच्या रक्तात वर्षानुवर्ष भिनलेला कालहरणाच्या सवयीत काडीमात्र फरक पडलेला नव्हता. आपल्या सर्वांना हे माहीत आहे की कलाकार हा नेहमी मुडीच असतो; पण सयाजीराव महाराजांनी त्यांनासुध्दा शिस्त लावण्याचे प्रयत्न केलेले दिसतात.

## बालगंधर्वांचे ब्लाऊज

गंधर्व कंपनीने महाराजांना दरवेळेस नवीन प्रयोग दाखविला पाहिजे असाही महाराजांचा नियम होता. महाराणी चिमणाबाईंना बालगंधर्वांची संगीत नाटके फार आवडत. बालगंधर्वांच्या चोळ्या ( ब्लाऊज ) महाराणी चिमणाबाईंना फार आवडत असत. त्या बालगंधर्वांचे ब्लाऊज गुपचूप राजमहालात मागवून घेत.

बालगंधर्वांना सुंदर आणि भरजरी किमती कपड्यांची खूप हौस होती. ते नाटकासाठी कपड्यांवर भरपूर पैसे खर्च करून आकर्षक स्त्री दिसण्यासाठी खूप भारी शालू आणि ब्लाऊज परिधान करत असत. चोळ्यांची शिलाई कशी आहे हे चिमणाबाई स्वत: बघत आणि तसेच ब्लाऊज बनवून घेत असत.



Bal Gandharva as Bhamini in the play *Manapaman* written by K.P. Khadilkar. Dhairyadhar's role is played by Joglekar.

गंधर्वांच्या नाट्यप्रयोगांचे जे छायाचित्र सध्या उपलब्ध आहेत त्यावरून त्यावेळसचे पडदे, दृश्यरचना आणि रंगमंचावरील सजावट यांच्यावर राजा रवी वर्माच्या चित्रांचा प्रभाव दिसून येतो. त्यांनी साकारलेली महाराष्ट्रीयन स्त्री आणि तिची वेषभूषा ही राजा रवी वर्माच्या सुरुवातीच्या खूप लोकप्रिय चित्रांवरून आणि बडोद्यात गंधर्वांच्या वास्तव्यात प्रत्यक्ष निरीक्षणातून घेतली असण्याचे नाकारता येत नाही. या फॅशन त्यावेळेस महाराष्ट्रात प्रचलित नव्हत्या त्या बालगंधर्व बडोद्यात राहून आल्यानंतर लोकप्रिय झाल्या अशा नोंदी सापडतात.

त्यामुळे बालगंधर्वांच्या वाढत्या लोकप्रियतेमध्ये बडोदा वास्तव्याचा मोठा वाटा मानला जातो. खुद्द बालगंधर्व महाराजा सयाजीराव गायकवाडांना आपले दैवत मानीत असत.

नाटक मंडळांना आश्रय देण्याची प्रथा सयाजीरावांच्या काळात गंधर्व नाटक मंडळीला आश्रय दिल्यामुळे उत्तम प्रकारे पार पाडली गेली असे म्हणता येईल.

“बडोद्याचे महाराज सयाजीराव यांच्या आश्रयाखाली” अशी बालगंधर्वांच्या नाटक कंपनीची जाहिरात करण्याची अनुमती महाराजांनी दिल्याबद्दल बालगंधर्वांना याचा नेहमी अभिमान वाटत असे.

## कलासक्त आणि सुधारणावादी सयाजीराव

गायकवाड घराणे शंभर वर्षांपेक्षा अधिक काळापासून संगीताचे आश्रयदाते म्हणून प्रसिध्द होते. तरीही सयाजीरावांच्या

पूर्वीचे दोन महाराज म्हणजे खंडेराव आणि मल्हारराव यांना अशा कलांना देता येण्याइतका वेळ नव्हता. सयाजीराव तिसरे बडोद्याचे महाराजा झाले तेव्हा त्यांना असे लक्षात आले की, बडोद्याचे संगीतघराणे नष्ट होत आले आहे. महाराज गणपतरावांच्या काळी शेकडो संगीतकार आणि नट गायकवाड संस्थानिकांच्या आश्रयाखाली जगत होते. आता ही संख्या कमी कमी होत जाऊन मोठ्या मुश्किलीने डझनावर येऊन पोहोचली होती.

गायनकला ही ललितकलेत प्रमुख कला मानली जाते. गायन कलेला महाराजांनी आपल्या कारकीर्दीच्या आरंभापासून उत्तेजन दिलं होतं. तिला आपल्या राज्यात व्यवस्थित स्वरूप देण्याचा प्रयत्न महाराजा सयाजीरावांनी केला होता. तथापि तिचा प्रसार अधिक विस्तृत प्रमाणावर होण्यासाठी व भिन्न भिन्न संगीत संप्रदायांच्या तज्ज्ञांना एकत्र आणवून त्यांना परस्परांशी विचारविनिमय करण्याची संधी देण्यासाठीं महाराजांनी इ.स. १९१६ च्या मार्च महिन्यात अखिल भारतीय संगीत परिषदेची बैठक बडोद्यास भरविली होती. सयाजीरावांनी आपल्या पदरी राजाश्रय दिलेले कलाकार या संगीत संमेलनात सहभागी होऊ शकले होते.

कलाकारांना आश्रय आणि प्रोत्साहन देऊन सयाजीराव थांबले नाहीत, तर त्यांनी कलेला समजून घेण्याचे, कलेची कदर करण्याचे आणि त्यात सुधारणा करण्याचे काम जाणीवपूर्वक केले.

## महाराजांचे गायन परिषदेतलं भाषण

इ.स. १९२९, १० मार्च रोजी बडोदे येथील राजवाड्याच्या विशाल दिवाणखान्यात गायन परिषद भरली होती. त्यावेळी महाराजांना ऐनवेळी भाषण करण्याबद्दल विनंती करण्यात आली होती. त्यांनी त्यावेळेस आपले विचार थोडक्यात मांडले होते. या भाषणात त्यांनी आपण संगीत कलेसाठी आजपर्यंत कोणते प्रयत्न केले याविषयी सांगितले. पण माझ्या प्रयत्नांना पाहिजे तसे यश आलेले नाही याला दोन कारणे आहेत असे ते म्हणाले. एक म्हणजे, आपल्याकडील संगीतज्ञांना आपले स्वत:चे ज्ञान लपवून ठेवण्याची आणि आपल्या पट्टशिष्यांनाही ते न देण्याची असलेली सवय हे होय. दुसरे कारण असे की, इकडच्या लोकांची आपल्या आयुष्यांत सात्त्विक आनंदाचा पूर्ण उपभोग घेण्याची प्रवृत्ती फार कमी आहे हे होय. याला आपल्या इकडचे दारिद्रय, औद्योगिक क्रांती वगैरे गोष्टी बऱ्याच अंशी कारणीभूत असल्या, तरी आपला नित्याचा उद्योग अधिक चांगल्या रीतीने करता येण्यास संगीताचा फार उपयोग होतो, या दृष्टीनेही त्या कलेचे ज्ञान संपादन करणे व त्याच्याबद्दल आपली अभिरुची वाढविणे अवश्य आहे, असे महाराजांनी सांगितले.

**शेवटी महाराज म्हणाले :-**

**"गायनाच्या योगाने तुम्हास जरूर सांपत्तिक लाभ झाला नाही, तरी आनंद व सौख्य यांचा लाभ खात्रीने होईल."**

**"If you want to measure the value of the culture of a country, look to its fine arts. Music, painting and architecture, are an index of a nation civilisation, and it is my belief, that the soul of a nation gets light and life from them."**

**"कोणत्याही देशाच्या संस्कृतीची किंमत जर आपल्याला आजमावयाची असेल, तर त्या देशांतील ललितकलांकडे आपण लक्ष द्यावे. गायन, चित्रकला या राष्ट्राच्या संस्कृतीची चिन्हे आहेत व त्यांच्यापासून राष्ट्राला प्रकाश व चैतन्य प्राप्त होते असे माझे ठाम मत आहे."**

**याप्रमाणे आपल्या राज्यात कलांचा विकास व्हावा या दूरदृष्टीने महाराजांनी केलेले प्रयत्न ते कलासक्त असण्याचे मोठे उदाहरण होय. त्या प्रयत्नांच्या मुळाशी असलेली आपली कल्पना त्यांनी या संगीत परिषदेत मोजक्या शब्दांनी दर्शविली आहे. त्यात ते म्हणाले,**

**"संगीत, चित्रकला वगैरे कला हिंदुस्थानच्या लोकांना आपल्या पूर्वजांपासून मिळालेला अमूल्य वारसा आहे. तो त्यांच्या मनो-भावनांशी सर्वस्वी निगडित झालेला आहे."**

हा वारसा न गमवता त्याची महाराजांनी आपल्या कारकीर्दीत यथाशक्ती वाढच केली, हेच त्यांच्या खऱ्या स्वदेशी वृत्तीचे लक्षण होय.

●●●





## संदर्भग्रंथ


१. आपटे दाजी नागेश, (१९३३), साहित्य आणि ललितकला, समाविष्ट, श्रीसयाजीगौरवग्रंथ, वाढदिवस मंडळ, बडोदे आणि मुंबई.

२. मालुंजकर भांड धारा,२०२०,ललितकला, खंड २५, भाग ५, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती उच्चशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

३.ताटके अरविंद, २००३, बालगंधर्व, मीनल प्रकाशन, कोल्हापूर.

४. गायकवाड सयाजीराव, २०१७, भाषण संग्रह खंड १, भाग १-२, संपादक : रमेश वरखेडे, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती उच्चशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

५. टेंभे गोविंदराव, सप्टेंबर १९४८, माझा जीवनविहार, दी भारत बुकस्टॉल, कोल्हापूर. इंग्रजी.

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर
- दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव
- डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर
- सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई
- दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव
गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील
- शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह
- देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद
- डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा
- राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती
- निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर
- सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक
कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण
परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा
- राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि
जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम
राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



❐ **महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**<u>मराठी :</u>**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**<u>English</u>**

- Spechess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**<u>हिन्दी :</u>**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com